किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३/२०२४
गणपत सातपुते विरुध्द पांडुरंग सातपुते
CNR:MHSN14-000780-2023

## नि.क्र. १६ वरील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मूळ दावा फेर फैलावर घेणेकरीता केलेला असून वि.प.नं. १ दि.१२/१२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस अर्जदार यांना पाच महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब अर्जदार यांनी जाणुन-बुजून केलेला नसून अर्जदारास वि.प. यांच्या मृत्यूचा दाखला वेळेत उपलब्ध न झाल्याने वारस रेकॉर्डवरती घेणेस विलंब झालेला आहे. सदरचा झालेला पाच महिन्यांचा विलंब माफ होणे आवश्यक असून वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नसून न्यायदानास मदत होणार आहे. सबब, मयत वि.प. नं. १ यांचे वारस रेकॉर्डवरती घेणेस झालेला पाच महिन्यांचा विलंब माफ होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. जाबदारतर्फे प्रस्तुत अर्जास अर्जावरच म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी वि.प.नं. १ यांना प्रस्तुत अर्जात नमूद वारस असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच विलंबाची कारणे योग्य नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करणेचा झालेस रक्कम रु. १,५००/- कॉस्ट करणेत यावी असे कथन केले आहे.

३. अर्जदार यांचा अर्ज, त्यावर जाबदार यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदार व जाबदारतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मूळ दावा फैलावर घेणेकरीता दाखल केला आहे. अर्जदार व जाबदार यांचे कथन तसेच वि.प.नं. १ यांचा मृत्यूचा दाखला पाहता निश्चितच अर्जदार यांना त्यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता विलंब झालेला आहे. अर्जदारतर्फे मृत्यू प्रमाणपत्र वेळेत न मिळाल्यामुळे विलंब झाला व त्यामुळे वेळेत वि.प.नं.१ चे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले आहे. अर्जाचा विचार करता वि.प.नं. १ यांचे वारसांचा दावा मिळकतीशी हक्क हितसंबंध आहे व त्यामुळे

त्यांना अर्जाचे कामी सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज गुणदोषांवर चालण्याकरिता वि.प.नं. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. मात्र अर्जदार यांचेकडून झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून जाबदार यांना अर्जदार यांनी रक्कम रु. ३००/- कॉस्ट देण्याचा आदेश करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

अर्ज नि.क्र.१६ अर्जदार यांनी जाबदार यांना रक्कम रु. ३००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.09.10 18:06:06 +0530

शिराळा **(व्ही.ए.देसाई)**

दिनांक १०/०९/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 10/09/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 10/09/2025 |
| Order uploaded on | : | 11/09/2025 |